# शासनाच्या विविध योजना/प्रकल्पांबाबतची माहिती

## (१) राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना

शासन निर्णय दि.१८/०२/२००९ अन्वये मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेतील इयत्ता ८ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या दारिद्रय रेषेखालील मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी होऊन त्यांना शिक्षणाकडे आकर्षित करण्याच्या हेतूने राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजनेअंतर्गत मोफत सायकलींचे वाटप करण्याची तरतूद केलेली आहे.

सदरची योजना यशस्वी होण्याच्या दृष्टिने विभागातील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी आवश्यक माहिती संचालनालयास सादर केलेली असून त्याआधारे विभागातील खालील जिल्हयांना मोफत सायकली मंजूर झालेल्या आहेत.

| अ.क्र. | जिल्हा | मंजूर सायकलींची संख्या |
|---|---|---|
| १ | कोल्हापूर | ११०१ |
| २ | सांगली | १९४० |
| ३ | सातारा | २७२७ |
| ४ | रत्नागिरी | २६२८ |
| ५ | सिंधुदुर्ग | १९०४ |

उपरोक्त प्रमाणे सायकलींचा पुरवठा करणेबाबत मे.शलाका इन्फ्राटेक (इंडीया) प्रा.लि.पुणे, १३ कमला रिजन्सी पेट्रोल पंपासमोर, एफ सी रोड, पुणे यांना कळविण्यात आले आहे. तथापि विभागातील कोणत्याही जिल्हयात सायकलींचा पुरवठा झालेला नाही.

सदर सायकलींचा पुरवठा होणेबाबत या कार्यालयाने संबंधित कॉन्ट्रॅक्टर व संचालनालयास पत्राद्वारे पाठपुरावा सुरु आहे.

शिक्षण संचालनालय
(प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
24 FEB 2009
६०४६४
आवक क्रमांक ५९६
शाखा

राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना सुरू करणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००८/३३८९२(९८१/०८)/माशि-३,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १८ फेब्रुवारी, २००९.

23 MAR 2009

वाचा:- १) शासन निर्णय क्र.अर्थसं-५९०८(प्र.क्र.५०/०८)/अर्थसंकल्प, दि. २८ जानेवारी, २००९.

**प्रस्तावना :-**

राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणा बरोबरच माध्यमिक शाळांचा विकास व विस्तार मोठ्या प्रमाणात झालेला आहे. शिक्षण हे व्यक्तिमत्व विकासाचे मूलभूत साधन असल्यामुळे सुरूवातीपासूनच राज्यात स्त्री शिक्षणाला महत्व देण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने शासनाने महिला धोरण २००१ जाहिर केलेले असून त्या अंतर्गत महिलांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करण्याकरीता व मुलींना शिक्षणाकडे आकर्षित करून घेण्याच्या दृष्टीने या धोरणांतर्गतच माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील इयत्ता ८ वी च्या मुलींसाठी मोफत लेडीज सायकल वाटप करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार 'राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना' सुरू करण्यास शासनाची मान्यता देत आहे.

**शासन निर्णय-**

'राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना' या योजनेंतर्गत शासन मान्यता प्राप्त अनुदानित माध्यमिक शाळेतील दारिद्र्य रेषेखालील इयत्ता ८ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींना लेडीज सायकल पुरविण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेकरीता रूपये २०.०० कोटी इतका अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थींस खालील अटी व शर्तीनुसार सायकल वाटप करण्यात यावे.

(१) इयत्ता ८ वी तील दारिद्र्य रेषेखालील मुली या योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहील.

(२) ग्रामीण भाग व क वर्ग नगरपरिषद क्षेत्रातील शाळा या ठिकाणी योजना लागू राहील.

(३) लाभार्थींचे घर व शाळेचे अंतर कमीत कमी २ कि.मी. एवढे असावे.

(४) इतर योजनेतून लाभार्थीस सायकल प्राप्त झाल्यास, या योजनेचा लाभ मिळणार नाही.

(५) इयत्ता ७ वी मध्ये कमीत कमी ४५% गुण प्राप्त केलेले असावेत.

(६) लाभार्थी ही शासन मान्यता प्राप्त अनुदानित माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असावी.

(७) लाभार्थीची निवड करतांना दुर्गम / अतिदुर्गम ग्रामीण भाग तसेच शहरी भागातील झोपडपट्टी/गलिच्छ वस्तीतील मुलींना प्राधान्य द्यावे.

३. सदर योजना ही शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) यांच्या स्तरावर राबवावयाची असून त्यांनी निकषाप्रमाणे लाभार्थ्यांची निवड करावयाची आहे.

४. या योजनेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या लेडीज सायकली या आयएसआय मार्कच्या असाव्यात, तसेच त्या सिंगल साईड स्टँड, घंटी, कॅरियर व कुलूप किल्ली सहीत असाव्यात व त्यावर 'राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजनातून' सायकल पुरविली असल्याबाबत ठळक अक्षरात नमूद केलेले असावे.

५ या योजनेंतर्गत वरील प्रकारच्या लेडीज सायकली पुरविण्यासाठी जाहिर निविदा मागविण्यात येऊन पुरवठेदाराची निवड करण्यात यावी. जाहीर निविदा मागविण्याची प्रक्रीया महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई या कार्यालयामार्फत करण्यात यावी. निविदेच्या प्रक्रीयेनंतर येणाऱ्या दरास अंतिम मान्यता शासनाची घेण्यात यावी.

६. या योजनेसाठी चालू आर्थिक वर्षात (सन २००८-०९) रू. २०.०० कोटी एवढा खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र.ई-२-२२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, ११० अशासकीय माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना सहाय्य(००) (१४) मुलींना मोफत सायकली पुरविणे (२२०२३८५१) ३१ सहाय्यक अनुदाने आणि २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ०२ माध्यमिक शिक्षण, ११० अशासकीय माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना सहाय्य (००) (१५) विशेष घटक योजनांतर्गत मुलींना मोफत सायकली पुरविणे (२२०२३८६२).

७. ही योजना राबविण्यासाठी शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांना नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

८. सदर आदेश वित्त विभागाच्या मान्यतेनुसार व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक- ६६०/२००८/व्यय-५ दि.२२/१०/२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर आदेश शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, त्यांचा संगणक संकेतांक क्रमांक २००९०२१८१९४२५३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(अ.मा. भट्टलवार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

परिपत्रक

क्रमांक संकिर्ण/२००९/६९५६५४/टी५१६ | १२९
प्राथमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे-१
दिनांक :- १/३/२००९

प्रति,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

उपरोक्त विषयाचे शासनाचे संदर्भांकित परिपत्रक पहावे. प्रस्तुत पत्र आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्र. शिक्षण संचालक (प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप
योजनाकरिता अनूदान उपलब्ध करण्याबाबत
सन २००८-२००९

13 MAR 2009

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२००८/३३८९२(१८१/०८)/माशि-३,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २ मार्च, २००९.

वाचा:१)शासन निर्णय क्र.अर्थसं-५९०८(प्र.क्र.५०/०८)/अर्थसंकल्प,दि.२८जानेवारी,२००९.
२) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२००९(१८१/०८)/माशि-३ दि. १८ फेब्रुवारी, २००९

**शासन निर्णय-**

'राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना' या योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दि. १८.२.२००९ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत, या योजनेसाठी सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात रुपये २०.०० कोटी इतका अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदर योजनेची अमलबजावणी करण्यासंदर्भात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड,मुंबई यांच्याकडून निविदा प्रक्रीया सुरु करण्यात आलेली असल्याने या योजनेचा मंजूर निधी शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई यांच्या खात्यावर तात्काळ वर्ग करावा. त्याचप्रमाणे या योजनेच्या लाभार्थ्यांची निवड करुन लाभार्थ्यांची जिल्हा निहाय यादी परिषदेस स्वतंत्रपणे उपलब्ध करुन द्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

( अ.मा. मट्टलवार )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व

[कृ.मा.प.

अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
स्थानिक निवासी लेखा परिक्षा अधिकारी ,मुंबई.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई.
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, सर्व
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद सर्व .
शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) जिल्हा परिषद सर्व
जिल्हा क्रीडा अधिकारी, सर्व
अधिक्षक, वेतन पथक (प्राथमिक / माध्यमिक) (सर्व )
वित्त विभाग(व्यय-५/अर्थसंकल्प-६), मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, माशि-३-२००८.

...........

# (२) **आय.सी.टी.योजना**

आय.सी.टी.योजना (१ ला टप्पा) मुख्याध्यापकाने भरावयाचा तिमाही कार्यवाही अहवाल

केंद्र शासन पुरस्कृत आय.सी.टी.योजना २००७-२००८ अंतर्गत राज्यातील निवडक ५०० माध्यमिक व उच्च माध्य. शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा उभारण्यात आलेल्या आहेत. त्या जिल्हयांची माहिती खालीलप्रमाणे

| **अ.क्र.** | **जिल्हयाचे नांव** | **शाळांची संख्या** |
|---|---|---|
| १ | कोल्हापूर | ६ |
| २ | सातारा | ५ |
| ३ | सांगली | १० |
| | **एकूण** | २१ |

प्रस्तुत शाळेत संगणक प्रयोग शाळा प्रत्यक्ष सुरु आहेत अगर कसे, सुरु असल्यास संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी विहित नमुन्यातील तिमाही अहवाल संचालनालयास सादर करणे आवश्यक आहेत. सदरचे अहवाल संचालनालयास सादर करण्यात आले आहेत अगर कसे याबाबत या कार्यालयास अद्याप माहिती अप्राप्त आहे. याच संदर्भात संचालनालयाचे पत्र दि.४/५/२०१० अन्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी कोणती कार्यवाही केलेली आहे तेही समजून येत नाही.

सदर आय.सी.टी.योजनेबाबतची सध्यस्थिती बाबतचा अहवाल संचालनालयास व कार्यालयास सादर करावा.

# (३) प्रोत्साहन भत्ता

राज्यातील वरिष्ठ प्राथमिक (इयत्ता ५ वी ते
७ वी ) शाळेत शिक्षण घेत असणाऱ्या
अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांच्या
उपस्थितीकरिता पालकांना प्रोत्साहन भत्ता
देण्यास मंजुरी देण्याबाबत (सन २००८-०९).

**महाराष्ट्र शासन**
अल्पसंख्यांक विकास विभाग,
शासन निर्णय क्र. असंस -२००९/प्र.क्र. ३७/कार्यासन-१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :- ५ फेब्रुवारी, २००९.

संदर्भ :- १) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक पीआरई-१०९१/(९६१४)/ प्राशि-१, दिनांक १० जानेवारी, १९९२.
२) शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक दिनांक २१ फेब्रुवारी, २००८.

**प्रस्तावना :-**

राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध विद्यमान योजनांचे परिणामकारक संनियंत्रण करण्याच्या दृष्टीने तसेच अल्पसंख्यांक समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विविध नवीन योजना तयार करुन त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता शासनाने दि.२१ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या अधिसूचनेन्वये स्वतंत्र अल्पसंख्याक विकास विभाग निर्माण केला आहे. नवीन योजनांपैकी या समाजातील शैक्षणिक मागासलेपणा दूर करण्याच्या दृष्टीकोनातून राज्यातील कायम विनाअनुदानीत शाळा वगळून सर्व शासकीय आणि खाजगी अनुदानित व विनाअनुदानीत वरिष्ठ प्राथमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते ७ वी मधील शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक (मुस्लिम, बौध्द, शीख, ख्रिश्चन, जैन व पारशी) समाजातील विद्यार्थ्यांचे शाळेतील उपस्थितीचे गळतीचे प्रमाण रोखण्याच्या उद्देशाने या विद्यार्थ्यांच्या पालकांना उपस्थिती भत्ता (प्रोत्साहन भत्ता) देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील शैक्षणिक मागासलेपणा दूर करण्यासाठी शासन मान्य वरिष्ठ प्राथमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्यांक (मुस्लिम, बौध्द, शीख, ख्रिश्चन, जैन व पारशी) समाजातील विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीकोनातून शासन मान्य सर्व शासकीय तसेच

खाजगी अनुदानित व विनाअनुदानित (कायम विनाअनुदानित शाळा वगळून) शाळेतील इयत्ता ५वी ते ७ वी मध्ये नियमित उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना रु.२/- (रुपये दोन फक्त) प्रती दिवस उपस्थिती भत्ता (प्रोत्साहन भत्ता) देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे. याकरिता सदरहू कालावधीत संबंधित विद्यार्थ्यांची शाळेमध्ये ७५ टक्के पेक्षा जास्त उपस्थिती असणे आवश्यक राहील. सदरहू प्रोत्साहन भत्ता या कालावर्षामध्ये जास्तीत जास्त २२० दिवसांसाठी देय राहील. तसेच शासनामार्फत सद्य:स्थितीत शालेय शिक्षण विभागाच्या उक्त संदर्भाधीन दि.१० जानेवारी, १९९२ च्या शासन निर्णयान्वये किंवा इतर प्रशासकीय विभागांच्या अथवा केंद्र शासनाच्या अस्तित्वात असलेल्या अशा प्रकारचा उपस्थिती (प्रोत्साहन) भत्ता या इयत्तेतील अल्पसंख्यांक विदयार्थ्यांना मिळत असल्यास अशा विद्यार्थ्यांना सदरहू योजनेतून दुहेरी लाभ देय राहणार नाही. मात्र अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना सद्य:स्थितीत मिळत असणारी उपस्थिती भत्त्याची रक्कम या योजनेतील मिळणाऱ्या उपस्थिती भत्यापेक्षा (प्रती दिवस रु.२/- पेक्षा) कमी असल्यास यातील फरकाची रक्कम त्यांना देय राहील.

२. चालू वर्षासाठी ही योजना १ जानेवारी, २००९ ते ३१ मार्च, २००९ पर्यंत लागू राहील. उपलब्ध माहितीनुसार राज्यामध्ये अशा वरिष्ठ प्राथमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना (मुलां-मुलींना) रु.२/- (रुपये दोन फक्त) प्रती दिवस प्रती विद्यार्थ्याप्रमाणे दिनांक ०१.०१.२००९ ते दि. ३१.०३.२००९ पर्यंतच्या कालावधीसाठी एकूण रु. ४.३२ कोटी (रुपये चार कोटी बत्तीस लाख फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहे.

३. अल्पसंख्यांक विकास विभाग हा नव्याने स्वतंत्र विभाग निर्माण झालेला आहे. या विभागाच्या नियंत्रणाखाली क्षेत्रिय कार्यालय उघडण्यात आलेली नसल्याने या प्रोत्साहन भत्ता वाटपाच्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या नियंत्रणाखालील शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी वरीलप्रमाणे या योजनेची अंमलबजावणी करावी. या वरिष्ठ प्राथमिक शाळेचा कालावधी लक्षात घेता सदरहू योजनेच्या अंमलबजावणीकरिता शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांनी उक्त संदर्भाधीन दि. १० जानेवारी, १९९२ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रोत्साहन भत्याचे वाटप केले जाते त्या धर्तीवर ग्रामीण व शहरी भागातील अशा सर्व संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांना विभागीय शिक्षण मंडळ कार्यालयांमार्फत लाभ होण्याच्या दृष्टीने या योजनेची कार्यवाही सोबत जोडलेल्या जिल्हानिहाय यादीप्रमाणे तातडीने सुरु करावी. मात्र प्रत्येक जिल्ह्यामध्ये अस्तित्वात असलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येप्रमाणे त्यांनी निधीचे वाटप करावे. याबाबत शालेय शिक्षण व क्रीडा

विभागाने योग्य ते आदेश तातडीने शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना द्यावेत.

४. या योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे करुन याबाबतचा अहवाल शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य यांनी सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील विहित नमुन्यात अल्पसंख्यांक समाजातील वर्गवारी निहाय आणि जिल्हानिहाय माहिती घेऊन एकत्रित अल्पसंख्यांक विकास विभागाकडे सादर करण्यात यावा.

५. या योजनेसाठी योजना संकेतांक व अनुदान वितरणाचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

६. हा शासन निर्णय नियोजन विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ७४ /व्यय-४/२००९, दि.५ फेब्रुवारी, २००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००९०२०५१७०५१७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
( एस. एस. काद्री )
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
संचालक, सर्व शिक्षा अभियान, चर्नीरोड, (पूर्व) मुंबई-४
*प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई ,
प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई, त्यांना विनंती आहे की, मा.विधानसभा / विधानपरिषद सदस्यांना कृपया या शासन निर्णयाची प्रत वितरीत करावी.
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) , जिल्हा परिषद,
*रजिस्ट्रार, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, मुंबई,
*रजिस्ट्रार, मा.उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ, नागपूर,
*रजिस्ट्रार, मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, प्रशासकीय इमारत ,मंत्रालयासमोर, मुंबई
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, बांद्रा (पूर्व) , मुंबई,
आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
धर्मादाय आयुक्त, मुंबई, / सर्व सहायक धर्मादाय आयुक्त,
सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई,
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०,
अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-५,
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, मुंबई,
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा) मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा) नागपूर,
संचालक, लेखा व कोषागरे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अधिदोन व लेखा अधिकारी , मुंबई,
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई ,
सर्व जिल्हा कोषाधिकारी,
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
वित्त विभाग (व्यय -४) (अर्थसंकल्प) (वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती.
* पत्राद्वारे.

(शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांक असंस-२००९/प्र.क्र.३७/का-१, दिनांक ५ फेब्रुवारी, २००९ चे विवरणपत्र)

राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील वरिष्ठ प्राथमिक (इयत्ता ५ वी ते ७ वी) शाळेत शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीकरिता पालकांना प्रोत्साहन भत्ता देण्यास मंजूरी देण्याबाबत. (सन २००८-०९).

## विवरणपत्र

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासन निर्णय मधील परि.४ मध्ये नमूद केल्यानुसार वाटप करण्यात आलेल्या प्रोत्साहन भत्त्याचा अहवाल शासनाला पुढील विहित नमुन्यानुसार पंधरा दिवसात सादर करावा.

| अ.क्र. | शाळेचे नाव व पत्ता | इयत्ता | एकूण विद्यार्थी | शाळेतील अल्पसंख्यांक समाजातील वर्गवारी निहाय (मुस्लीम, बौध्द,जैन ख्रिश्चन,शीख, पारशी) विद्यार्थ्यांची संख्या | अल्पसंख्यांक समाजातील वर्गवारी निहाय विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात वाटप करण्यात आलेल्या प्रोत्साहन भत्त्याची माहिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |

वरीलप्रमाणे विहित टप्प्यात शिक्षण उपसंचालकांनी / शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद जिल्हानिहाय प्रत्येक शाळेतील माहिती घेऊन ती एकत्रित करुन शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावी व त्यांनी राज्याची सदर माहिती एकत्रित करुन शासनाला विहित मुदतीत सादर करावी.

शासन निर्णय, अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांक असंस-२००९/प्र.क्र.३७/का-१, दि.५ फेब्रुवारी, २००९ चे जोडपत्र

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद- एनरॉलमेन्ट मायनॉरिटी ऑल मॅनेजमेन्ट (३८४४ उर्दू शाळांसहित) वर्ग - इयत्ता ५ वी ते ७ वी

वर्ष २००७-०८

| जिल्हा कोड नं. | जिल्हा | इयत्ता ५ वी | | | इयत्ता ६ वी | | | इयत्ता ७ वी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुली | मुलगे | एकूण | मुली | मुलगे | एकूण | मुली | मुलगे | एकूण |
| २७०१ | नंदुरबार | ४८७ | ६५५ | ११४२ | ४६७ | ५३२ | ९९९ | ४६४ | ४५१ | ९१५ |
| २७०२ | धुळे | १०६८ | १११० | २१७८ | ८७८ | १०२३ | १९०१ | ८७१ | ९०० | १७७१ |
| २७०३ | जलगाव | २६९० | ३१२२ | ५८१२ | २४३४ | २७०६ | ५१४० | २४४४ | २५६७ | ५०११ |
| २७०४ | बुलढाणा | २८२७ | २६१८ | ५४४५ | २६१४ | २५९७ | ५२११ | २२५१ | २१२९ | ४३८० |
| २७०५ | अकोला | २५५९ | २६१० | ५१६[illegible] | २३६६ | २४१२ | ४७७८ | २२६२ | २१४० | ४४०२ |
| २७०६ | वाशिम | १०२१ | ८८२ | १९०३ | ८८७ | ७५० | १६३७ | ७८० | ७२१ | १५०१ |
| २७०७ | अमरावती | ३०७२ | ३६४२ | ६७१४ | २९३२ | ३२२६ | ६१५८ | २६५६ | २९९१ | ५६४७ |
| २७०८ | वर्धा | १९२ | २४२ | ४३४ | २१२ | २५५ | ४६७ | १८७ | २९८ | ४८५ |
| २७०९ | नागपूर | २३६२ | २३४२ | ४७०४ | २१३७ | २११३ | ४२५० | २०९९ | २०८४ | ४१८३ |
| २७१० | भंडारा | २०० | २०८ | ४०८ | २०९ | २२४ | ४३३ | २१६ | २२२ | ४३८ |
| २७११ | गोंदिया | ७१ | ९० | १६१ | ८७ | ७३ | १६० | ८३ | ७० | १५३ |
| २७१२ | गडचिरोली | १५० | १५४ | ३०४ | १०४ | १४५ | २४९ | ११३ | १३६ | २४९ |
| २७१३ | चंद्रपूर | ५९३ | ६४८ | १२४१ | ६२४ | ६०० | १२२४ | ५३८ | ५४० | १०७८ |
| २७१४ | यवतमाळ | १२१० | १११४ | २३२४ | १०८१ | ९७४ | २०५५ | ९३२ | ९३७ | १८६९ |
| २७१५ | नांदेड | ३३४४ | ३३७४ | ६७१८ | ३१७३ | २९७४ | ६१४७ | २७२४ | २६४७ | ५३७१ |
| २७१६ | हिंगोली | ९८९ | १०६६ | २०१५ | १००२ | १०२७ | २०२९ | ८७३ | ९७१ | १८४४ |
| २७१७ | परभणी | १३७६ | १५९२ | २९६८ | १३७१ | १४१२ | २७८३ | १२२५ | १२९९ | २५२४ |
| २७१८ | जालना | १९८८ | २१३८ | ४१२६ | १९७१ | १७४० | ३७११ | १६३४ | १५३६ | ३१७० |
| २७१९ | औरंगाबाद | ३६२३ | ३८३३ | ७४५६ | ३५३६ | ३५१८ | ७०५४ | ३०८८ | ३३९६ | ६४८४ |
| २७२० | नाशिक | ५६२३ | ५४५० | ११०७३ | ५४३० | ५५८९ | ११०१९ | ४९९६ | ४७०६ | ९७०२ |
| २७२१ | ठाणे | ५७४० | ६९८८ | १२७२८ | ५०५९ | ६३४० | ११३९९ | ४८२७ | ५७६५ | १०५९२ |
| २७२२ | मुंबई (मनपा) | ४०७१ | ४२८८ | ८३५९ | ३९०० | ४२४१ | ८१४१ | ३५४० | ३५८४ | ७१२४ |
| २७२३ | मुंबई-२ | ५८१४ | ७९१४ | १३७२८ | ५६७८ | ७५१८ | १३१९६ | ५४६५ | ६९४९ | १२४१४ |
| २७२४ | रायगड | १३५५ | १३९४ | २७४९ | १२९८ | १३०२ | २६०० | ११८४ | १२२७ | २४११ |
| २७२५ | पुणे | २८५९ | २९९१ | ५८५० | २६१९ | २६२३ | ५२४२ | २३१४ | २२०६ | ४५२० |
| २७२६ | अहमदनगर | २२७३ | २३०३ | ४५७६ | २२९७ | २३०७ | ४६०४ | २०३५ | २०५६ | ४०९१ |
| २७२७ | बीड | २७४४ | २७८२ | ५५२६ | २६८५ | २५९८ | ५२८३ | २५०६ | २३२२ | ४८२८ |
| २७२८ | लातूर | ३०३३ | ३९३५ | ६९६८ | २९१४ | ३१६९ | ६०८३ | २८३० | २८१[illegible] | ५६४६ |
| २७२९ | उस्मानाबाद | १४४९ | १३४४ | २७९३ | १३३२ | १३४६ | २६७८ | १३७४ | १२४७ | २६२१ |
| २७३० | सोलापूर | ३८९७ | ४००९ | ७९०६ | ३७९७ | ३८४३ | ७६४० | ३५१८ | ३४९४ | ७०१२ |
| २७३१ | सातारा | ७५७ | ९६५ | १७२२ | ६४७ | ८५६ | १५०३ | ६८३ | ८३६ | १५१९ |
| २७३२ | रतनागिरी | १३०८ | १२८३ | २५९१ | १२१० | १२७४ | २४८४ | १०५७ | ११४५ | २२०२ |
| २७३३ | सिंधुदुर्ग | १६० | १७० | ३३० | ९४९ | १८९ | ३८४ | १४८ | १७८ | ३२६ |
| २७३४ | कोल्हापूर | १४४१ | १६०८ | ३०४९ | १३९६ | १४६५ | २८६१ | १३८३ | १३०२ | २०५५ |
| २७३५ | सांगली | १८२१ | १९८० | ३८०१ | १८०२ | १७८३ | ३५८५ | १६९५ | १६७१ | ३२६६ |
| | एकूण | ७४१२७ | ८००४४ | १५४१७१ | ७०३०६ | ७४४४४ | १४५०५२ | ६४९९५ | ६७६७९ | १३२६७४ |

## (४) विषयमान्यता

## अतिरिक्त विषयास मंडळाची मान्यता मिळणेसाठी त्रुटींची पूर्तता करणेबाबत

जा.क्र.माध्य–3/विषयमान्यता/कोवि/09
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर दिनांक :–

प्रति,

............................................................
............................................................
............................................................

विषय :– ............................................................ या अतिरिक्त विषयास मंडळाची मान्यता मिळणेसाठी त्रूटींची पूर्तता करणेबाबत.

संदर्भ :– ............................................................
............................................................

वरील संदर्भिय विषयास अनुसरुन आपणांस कळविणेत येते की, ............................................................ या विषयास मान्यता देण्याबाबत आपल्याकडून प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. तथापी सदर प्रस्तावामध्ये खालीलप्रमाणे त्रूटी आढळून आलेल्या आहेत.

1. शिक्षणाधिकारी माध्यमिक यांची शिफारस नाही
2. विषय मान्यता विनिमय क्र. 28 9 नुसार विहित नमुन्यातील प्रपत्रानुसार माहिती पाठवावी.
3. ज्या विषयासाठी मान्यता मागितली आहे त्या विषयाच्या माध्यमाचा उल्लेख नाही.
4. अर्हताधारक शिक्षक वर्गाचा तपशिल असलेला तक्ता नाही.
5. कोणत्या विषयाच्या ऐवजी विषय सुरु केला त्याचा तपशिल नाही.
6. विदयार्थ्यांच्या स्वाक्षरीसह विदयार्थ्यांची यादी जोडलेली नाही.
7. विद्यमान विषयांच्या शिक्षकांच्या कार्यभारावर परिणाम होतो की नाही याची स्पष्टता दिलेली नाही.
8. ............................................................

उपरोक्त प्रामणे त्रूटींची पूर्तता त्वरीत करुन प्रस्ताव दोन प्रतीत सादर करावा. तदनंतर पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल.

शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

## (५) अशासकीय माध्यमिक शाळांना कायम मान्यता प्रदान करणेबाबत

जा.क्र.माध्य-३/कायम मान्यता/कोवि/०९/५९४६-५१
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर दिनांक :- ३ फेब्रुवारी, २०००

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद कोल्हापूर विभाग

विषय : अशासकीय माध्यमिक शाळांना कायम मान्यता प्रदान करणेबाबत.

माध्यमिक शाळा संहिता १९८६ मधील तरतूदी तसेच वेळोवेळी निर्गमित शासन परिपत्रक/शासन निर्णय/आदेशास अनुसरुन अशासकीय माध्यमिक शाळांना कायम मान्यता देण्याबाबतचे प्रस्ताव सादर केले जात नसल्याचे सन १९९९-२००० मध्ये प्राप्त प्रस्तावांची पडताळणी करता निदर्शनास येत आहे. अशासकीय माध्यमिक शाळांना कायममान्यता प्रदान करण्यापूर्वी सदर बाबत आपले स्तरावरुन काळजीपूर्वक पडताळणी करणे अत्यंत आवश्यक आहे. ही बाब आपणास विदीत आहेच. सबब कायम मान्यता प्रस्ताव खालील कागदपत्रे/अहवाल तसेच त्याबाबत आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय व शिफारशीसह या कार्यालयात सादर करण्यात यावीत.

१. प्रस्तावीत शाळा सूरु करणेस परवानगी दिल्याच्या पत्राची प्रत.
२. प्रथम मान्यता पत्राची प्रत.
३. एस.एस.सी.बोर्डाकडून सांकेतीक क्रमांक दिलेल्या पत्राची प्रत.
४. शाळा संहिता नियम २.१ अनुसार विहित नमून्यातील अर्ज.
५. शाळा सुरु झाल्यापासून आजअखेरचे शैक्षणिक तपासणी अहवाल.
६. प्रस्तावीत शाळेतील भौतीक सुविधा (इमारत, क्रिडांगण, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सोय, पुरेसे फर्निचर इ.) ची माहिती.
७. शाळेतील शैक्षणिक सुविधा (प्रयोगशाळा साहित्य, ग्रंथालय पुस्तेक, पुस्तकपेढी, वाचनालय इत्यादी) ची माहिती.
८. शाळेतील वर्गवार विद्यार्थी संस्था मंजूर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संख्या तसेच कार्यरत कर्मचाऱ्यांची सेवा व शिक्षणविषयक माहिती.
९. शाळेचा शैक्षणिक उपक्रमातील सहभागाबाबतची माहिती.
१०. क्रिडा, वत्कृत्व, निबंध इत्यादी स्पर्धा तसेच विज्ञान प्रदर्शन, विज्ञान मेळावा इ. विज्ञान विषयक स्पर्धामध्ये शाळांच्या सहभागा विषयी माहिती.
११. शाळेचे मागील तीन वर्षाचे एस.एस.सी.परीक्षा निकाल.
१२. शाळेचे व्यवस्थापन पुरेशे सक्षम आहे काय? याबाबतची माहिती.
१३. शाळा १०० टक्के अनुदानावर आलेल्या आदेशाची प्रत.
१४. शाळा/संस्थेविरुध्द तक्रारी, न्यायालयीन प्रकरणे, लोकायुक्त प्रकरणे असलयास त्याचा तपशिल.
१५. शाळा/संस्थामध्ये शालेय समिती, शिक्षक समिती विषय समिती, पालक शिक्षक संघ इत्यादी समित्या गठीत केलेल्या असल्यास त्याचा तपशिल.

अशासकीय माध्यमिक शळांना कायम मान्यता देणेबाबबत प्राप्त प्रस्तावांची सक्षम अधिकाऱ्यामार्फत शाळेस समक्ष भेट देऊन पडताळणी करावी व त्याचा अहवाल प्रस्तावा सोबत सादर करावा.

शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर करिता

स्थळ प्रतिवर मा.शि.ऊ.स.यांची सही असे

प्रत माहितीकरिता :-
अध्यक्ष, कोल्हापूर जिल्हा माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ विद्याभवन, शिवाजी पार्क कोल्हापूर